# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १५/०३/२०२५ (शनिवार) संध्याकाळ**

---

## खुन करणाऱ्या आरोपीला अटक

**पोस्टे नरखेड:—** सदर घटना पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत दिनांक १४/०३/२०२५ रोजी १२:०० ते १२:५० वाजताच्या दरम्यान खारी पेठ नरखेड येथे घडली. यातील मृतक आरोपी एकाच गावात राहणारे आहे. दिनांक १४/०३/२०२५ रोजी १०:०० वाजता राममंदीर नरखेड समोर दोन व्यक्तींचा एकमेकांचे मोटर सायकल ला ठोस लागल्यावरून वाद सुरू असतांना यातील मृतक चे वडील नामे विजय वसुले रा. वार्ड क्र ७, नरखेड यांनी सदर भांडण सोडविण्या करीता मध्यस्थी केली त्यावेळी तेथे हजर असलेल्या नितेश उर्फ जर्मन माधवराव कवडती रा वार्ड क्र ३, नरखेड याने मृतक चे वडील विजय वसुले यांना धक्काबुक्की केली. सदर बाब यातील मृतक नामे हिमांशु विजय वसुले, वय २२ वर्षे,रा. वॉर्ड नं ७, नरखेड याला महीती झाली असता तो आरोपीला जाब विचारायला गेला असता तेथे यातील आरोपी नामे नितेश उर्फ जर्मन माधवराव कवडती, रा वार्ड क्र ३, नरखेड आणि मृतक हिमांशु विजय वसुले, वय २२ वर्षे,रा. वॉर्ड नं ७, नरखेड यांचा आपसात वाद झाल्याने आरोपीने मृतक याचा चाकुने वार करून खुन केला.

सदर प्रकरणी फिर्यादी शुभम सुभाष गिरडकरवय, २६ वर्षे, रा.वार्ड क्र. ०३ नरखेड ता.नरखेड, जि. नागपूर यांचे रीपोर्ट वरून पोस्टे नरखेड येथे नितेश उर्फ जर्मन माधवराव कवडती रा वार्ड क्र ३, नरखेड याच्या विरूद्ध कलम १०३(१) भा.न्या.सं २०२३ अन्वये गुन्हा नोंद केला असुन **नमुद आरोपीला पोलीसांनी अटक केली आहे.**

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर